Review Of Research
Vol. 3, Issue. 2, Nov. 2013
ISSN:-2249-894X Available online at www. ror.isrj.org

ORIGINAL ARTICLE

# भटक्या विमुक्तांची जातपंचायत

**प्रा.डॉ.दिपक रिटे**

**विज्ञान महाविद्यालय मराठी विभाग सांगोला, जि.सोलापूर.**

**प्रास्ताविक :-**

भटक्या जातीजमाती हया संस्कृतीने व भौगोलिक कारणाने वेगवेगळया आहेत. पालावरचं जगणं जगणा-या या जमाती शिकार करुन, जनावरे पाळून, त्यांची खरेदी विक्री करुन, पारंपारिक कलेच्या आधारे, भविष्य पाहून, देवाच्या नावाने भीक मागून, मागते म्हणून, धार्मिक विधी करणारे, अंगमेहनतीची व शारीरिक कष्टाची कामे करणा-याही जमातीही आहेत. याचं जगण्याचं विश्व प्रस्थापित वर्ण व्यवस्थेपेक्षा वैशिष्टयपूर्ण आहे.

'समाज' या संकल्पनेमध्ये किंवा सामाजिक आंतरक्रियेमध्ये सामाजिक नियमने, कायदे यांना महत्त्वाचे आहे. समाजाच्या गरजा भागवण्यासाठी ते नियमने उपयुक्त ठरतात. अन्न, वस्त्र, निवारा, हवा, पाणी या गोष्टी माणूस जिवंत ठेवण्यासाठी आवश्यक गरजा आहेत. त्याचप्रमाणे समाजाचे अस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी जातपंचायत आवश्यक आहे. लोकसंख्या जतन, नैतिकता सांभाळणे, कार्यविभाजन, कामाचे वाटप, सामाजिक ऐक्य, समाजाचे सातत्य टिकवणे यासाठी प्रत्येक जाती जमातींनी स्वतंत्र असे अलिखित नियम तयार केले आहेत. रुढी, परंपरा, चालीरीती, लोकनिती यातून भटक्या जाती-जमातींची 'जातपंचायत' अस्तित्वात आली. अज्ञान, अंधश्रध्दा यातून अस्तित्वात आलेल्या या व्यवस्थेला जाती जमातींमध्ये महत्त्व आहे. जातपंचायतीतून न्यायदान प्रक्रिया होत असताना समाजातील सर्व सदस्यांना सामावून घेवून न्याय देण्याची प्रथा जातपंचायतीमध्ये असल्याने त्यामध्ये पारदर्शकता असते. तसेच ती त्या समाजाचे 'सर्वोच्य न्यायालय' असते. जातीजमातीतील संघर्ष, भांडणतंटा, लग्नकार्य, सोडचिठ्ठी, पुनर्विवाह, सामाजिक कार्य, अनैतिक संबंध, चोरी, मारामारी यांचा न्यायनिवाडा करण्याचे काम जातपंचायतीवर अवलंबून असते. जातपंचायत ही त्यांची पवित्र न्यायसंस्था आहे. जाती अंतर्गत कोणताही वाद घेऊन ते प्रस्थापितांच्या न्यायव्यवस्थेकडे जात नाहीत. तर एखादया व्यक्तीने असे केले तर तो त्याचा सामाजिक गुन्हा, पाप समजून त्याला जातीतून बहिष्कृत करण्याची शिक्षा जातपंचायत देते. जातपंचायत बसण्याची मुख्य ठिकाणे म्हणजे कारुंडे, सोनारी, जेजुरी ही आहेत. तर 'सुप्रिम कोर्ट' म्हणून 'मढी' ओळखण्यात येते. एखादया जातीला खालच्या कोर्टात न्याय मिळाला नाही असे वाटले तर तो व्यक्ती सुप्रिम कोर्टात न्याय मागत असतो.

भटक्या जाती जमातींची जातपंचायत ही स्वातंत्र्य , सुरक्षितता, नैतिकता आणि पारंपारिकतेचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. न्यायव्यवस्थेवर त्यांचा विश्वास व अभिमान आहे. या जातपंचायतीचे पंच प्रमुख म्हणून पाटील, सरपंच, मुखिया, पटेल हे वंशपरंपरेने चालत आलेल्या कुंटूंबील असतात. प्रत्येक जातीची न्यायदान करण्याची पध्दत वेगळी आहे. समाज अंतरक्रियेचा विचार करीत असताना जातपंचायत कोणकोणत्या बाबतीत वेगळी आणि वैशिष्टपूर्ण आहे हे भटक्यांच्या जातपंचायतीतून दिसून येते.
''

एखादी व्यक्ती गुन्हेगार असेल आणि ती गुन्हा कबुल करीत नसेल तर संबंधीत व्यक्तीस जातपंचायत खरे खोटे तपासून पाण्यासाठी उकळत्या तेलातील पैसा काढण्याची शिक्षा देते. अथवा गुन्हयाच्या स्वरुपावरुन पैशाच्या स्वरुपात दंड करते. किंवा बहिष्कृत, वाळीत टाकणे. वेळप्रसंगी संबंधीत व्यक्तीचे नाक कापण्याची शिक्षा देते. जातपंचायतीच्या गुन्हयाच्या स्वरुपावरुन शिक्षा देण्याची पध्दतही वेगळी आहे. सामाजिक, सार्वजनिक कार्यक्रमामध्ये पंचायतीचा सहभाग महत्त्वाचा आहे. पंचायतीचे निर्णय सर्व समाजाला बंधनकारक असतात. 'पद्मशिल' समाजामध्ये एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला आणि तो पंचायतीमध्ये सिध्द झाला तर गुन्हेगार व्यक्तीकडून एकशे एक्कावन्न ते एक हजार रुपयांपर्यंत दंड वसूल केला जातो. संबंधित व्यक्तीने दंड देण्याचे नाकारले तर जातपंचायत त्याला जातीतून बाहेर करण्याची शिक्षा देते. 'कोल्हाटी' समाजाची जातपंचायत ही सदोष मानण्यात येते. जातीतील आर्थीक किंवा शेतीचे व्यवहार लिहून ठेवले जात नाहीत. तर ते संपूर्ण लेखी, तोंडी स्वरुपाचे असतात. अशावेळी जर एखादया व्यक्तीने व्यवहारात फसवणूक केली तर खरेखोटे करण्यासाठी 'हाडी मारणे' अशा विशिष्ट विधीचे आयोजन करण्यात येतो. "एका मडक्यात तेल" अगर शेण किंवा गोमूत्र घालून ते मडके विस्तवावर ठेवून उकळी येईपर्यत तापवले जाते. नंतर त्या मडक्यात पैसा अगर न विरघळेल असा खडा टाकतात व ज्यांचेवर संशय असेल त्या व्यक्तीस उकळत्या आधाणातून पैसा किंवा खडा हाताने काढण्यास सांगतात. जर त्या व्यक्तीचा हात भाजला तर तो खोटे बोलतो, आणि जर हात भाजला नाहीतर तो खरा." (१) यासारख्या कठोर शिक्षेतून जातीमध्ये एकोप्याचे वातावरण राहण्यास मदत होते. जातीतील स्त्री अथवा पुरुषाने दुस-या जातीतील पुरुषाची अथवा स्त्रीशी अनैतिक संबंध ठेवले अथवा लग्न केलेतर संबंधीत व्यक्तीस जातीबाहेर टाकण्यात येते. त्यामुळे या जमातीतील व्यक्ती जातीबाहेरील व्यक्तीशी कोणत्याही प्रकारचे संबंध ठेवीत नाहीत. जातीबाहेर संबंध ठेवणा-या व्यक्तीस पैशाच्या स्वरुपात ५१ ते १०१ रुपये दंड केला जातो. त्याला 'टच्चा देणे.' (समज देणे) असे म्हणतात. 'गोपाळ' समाजात भांडण तंटा, कलह निर्माण झाला तर जातपंचायत बसते. या जात पंचायतीमध्ये पाटलास महत्त्व देण्यात येते. पाटलाचा निर्णय समाजावर बंधनकारक असतो. गुन्हेगार व्यक्तीस जातीबहिष्कृत करण्यात येते. त्यास 'पावलीबंद' असे म्हणतात. समाजात पावलीबंद होणे अप्रतिष्ठेचे व नामुष्कीचे समजले जाते. त्या व्यक्तीला कवडीचीही किंमत दिली जात नाही. संबंधीत व्यक्ती कितीही श्रीमंत असली तरी गरीबातला गरीब व्यक्तीही अशा व्यक्तीशी कसल्याही प्रकारचे सबंध ठेवीत नाहीत. त्याचप्रमाणे 'घ्यारे' समाजात एखादया व्यक्तीने महिलेला पळविले तर संबंधीत व्यक्तीस वाळीत टाकले जाते त्या व्यक्तीशी कसल्याही प्रकारचे रोटी, बेटी व्यवहार केले जात नाहीत.. तसेच बहिष्कृत व्यक्तीविषयी गावोगावच्या समाजातील लोकांना कळविण्यासाठी बहिष्कृत व्यक्तींच्या वडिलांचा चिंध्यांनी बनवलेला पुतळा वस्तीजवळच्या झाडाला टांगून त्याची माहिती देण्याची पध्दत आहे.

'रजपूत भामटा' या समाजाच्या शिक्षेचे स्वरुप भयंकर असून अमानवी आहे. "एखादया स्त्रीने जर व्याभिचार केला किंवा जातीत अथवा जातीबाहेर अनैतिक संबंध ठेवले तर अशा स्त्रीला जातपंचायत गुन्हेगार ठरवून संबंधीत स्त्रीचे नाक कापण्याची शिक्षा दिली जाते." (२) यासारख्या भयंकर शिक्षेमुळे लोक जाती अंतर्गत गुन्हे करीत नाहीत तर स्त्रिया नाक काण्याच्या कठोर शिक्षेमुळे अनैतिक संबंधीत ठेवीत नाहीत. समाजाच्या व स्त्रीच्या चारित्र्याच्या दृष्टीने दिली जाणारी ही शिक्षा अत्यंत रानटी व अमानवी आहे. मानवी समूहातील एक कळप इतका भयंकर वागू शकतो याची प्रचिती रजपूत भामटा या जातपंचायती वरुन लक्षात येते. गुळाची अथवा कोंबडयाची शपथ घेऊन न्यायनिवाडा करणारी 'कंजार' भाट यांची जातपंचायत वेगळी आहे". पाचशे गोव-या आणून पेटीवतात पेटत्या गोव-यामध्ये ५ किलो वजनाची लोखंडी कु-हाड ठेवली जाते पहाटेपर्यत ती कु-हाड तापवली जाते, पहाट झाल्यावर गुन्हेगार व्यक्तीला पाणी आणि दुध एकत्र करुन अंघोळ घातली जाते. पाच हात नवे कपडे नेसायला दिले जाते. नंतर त्याच्या गळयात जानवे घालून, त्याच्या हातात पिंपळाची सात पाने दिली जातात. ती पाने तळ हातावर दो-याने गुंडाळली जातात. नंतर पंचायतीच्या प्रमुख परमेश्वराला हाकारतो (विनंती करतो) कीं, हा गुन्हेगार त्याच्यावर आम्ही तप्त कु-हाड ठेवतो, तुम्ही न्याय द्या" (३) यासारख्या शारीरिक भयंकर शिक्षेतून संबंधीत गुन्हेगार व्यक्ती असेल त्याचे हात भाजतात आणि गुन्हेगार नसेलतर हाताचा दोरासुध्दा जळत नाही अशी त्यांची भावना आहे. यासारख्या शिक्षेतून त्यांचे मागासलेपण, अंधश्रध्दा स्पष्ट होते. 'राजगौंड' समाजामध्ये जातपंचायतीचा प्रभाव असल्याचे दिसते.. समाजामध्ये एखादया व्यक्तीस आर्थीक कारणावरुन फसवले तर जातपंचायत अशा व्यक्ती शिक्षा करते. एखादया व्यक्तीने समाजातील दुस-या व्यक्तीचे हात उसणे घेतलेले पैसे देण्यास नकार दिला तर जातपंचायत पैसे बुडविणा-या व्यक्तीस जाती बहिष्कृत करते आणि त्याला एक विशिष्ट शिक्षा दिली जाते. संबंधीत व्यक्तींच्या नावाने वस्ती बाहेर झाडाला झोळी टांगली जाते त्या झोळीत (त्या व्यक्तीचा निषेध म्हणून) त्याच्या नावाने जुन्या चपला, बुट ठेवल्या जातात. मात्र संबंधीत व्यक्तीने पैसे देण्यास कबुली दिली तर आणि पुन्हा जातीमध्ये यायचे असेलतर, जातपंचायत त्याची दाढी, मिशा कापून त्याला समाजात घेतले जाते". (४) समाजात कोणत्याही प्रकारची लेखी टाकी न ठेवता केवळ विश्वासावरती चालणारी ही जमात आहे. मेंढयांच्या जातपंचायतीचे स्वरुप इतर जाती जमातींच्या तुलनेने

वेगळे आहे. स्त्रीने अनैतिक संबंध ठेवले, चोरी केली, परजातीतील स्त्रीघरात ठेवली तर अशावेळी संबंधीतांना पंचायत जाब विचारते, दंड करते हा दंड पैशाच्या स्वरुपात असतो तर काही वेळी संबंधीतांची मिशी काढली जाते. 'लमाण' समाज अनैतिक संबंध ठेवणा-या स्त्रीला जातीतून बहिष्कृत करते. जातीतील स्त्रीचे अस्तित्व व नैतिकता या दृष्टीने दिली जाणारी शिक्षा अत्यंत कठोर अशी आहे. पोटासाठी गावोगाव भटकणारा 'गोसावी' आपल्या जातीतील स्त्रीने चारित्र्य संपन्न रहावे, इतर समाजातील पर पुरुषांकडे वेगळया नजरेने पाहू नये यासाठी तो शिक्षा देत आहे. शिक्षा जरी अमानवी असली तरी समाजाच्या अस्तित्वासाठी ती योग्य आहे असे तो मानतो. नाथपंथी डवरी समाजात एखादया व्यक्तीने समाजातील स्त्री बरोबर अनैतिक संबंध ठेवले तर जातपंचायत त्याला शिक्षा करते.'' एखादया व्यक्तीने त्याच्या सख्या भावाची बायको भावाच्या मृत्यूनंतर पत्नी म्हणून स्वीकारली किंवा तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले आणि लग्न केले तर अशा व्यक्तीचे उजवे कल्ले आणि मिशी पंचायत काढून टाकते किंवा त्याला काढण्यास भाग पाडते''. (५) हा समाज नीती-अनिती सांभाळण्याचे काम जात-पंयायतीमधून करीत आहे. तसेच कौटुंबिक संस्कार संबंधीत करण्याचा प्रयत्न करीत आहे. पंचायतीमध्ये अनैतिकतेचेच्या बाबतीत पुरुषांना कठोर शिक्षा देऊन स्त्री समानता जोपासत आहे. तेंव्हा स्त्रियांच्या संरक्षणासाठी नाथपंथी डवरी समाजामध्ये जातपंचायत महत्त्वाची मानली जाते. या संदर्भात प्रा. रामकृष्ण मोरे म्हणतात''. जातपंचायतीबाबत रामनाथ चव्हाणांनी लिहलेले पुस्तक हे भटक्या विमुक्त जाती जमातींचे समाज जीवन रेखाटणारा सामाजिक दस्तऐवज असून, भटक्या जातीतील लोकांच्या समस्यांकडे डोळसपणाने पाहून त्या समस्या का उद्‌भवल्या याचा विचार गांभिर्याने इतरांनी केला पाहिजे''. (६) जातीच्या अस्तित्वासाठी, स्त्रियांच्या संरक्षणासाठी जात पंचायत नष्ट केली पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळात समाजाच्या नजरा बदलल्या पाहिजेत असा आशावाद व्यक्त करतात. कैकाडी, मातीवडार या जमाती गुन्हेगार व्यक्तीस पैशाच्या स्वरुपात दंड करतात. तर गाडीवडार झाडाला बांधून चाबकाने फटके मारते. ओतारी समाज एखादया स्त्रीने अथवा पुरुषाने पळवून आणले, जातीचे नियम तोडले तर जातपंचायत समाजद्रोही म्हणून शिक्षा करते. जातीत शिवीगाळ करणे, चोरीमारी करणे, एखादयावर कु-हाड उचलणे असे गंभीर गुन्हे, मरीआईवाले समाजात झालेतर पैशाच्या स्वरुपात दंड करते. 'शबरी भिल्ल' समाजातील एखादया व्यक्तीने समाजातील स्त्रीच्या मनाविरुध्द तिच्याशी अनैतिक संबंध ठेवला, किंवा जातीबाहेरच्या स्त्रीशी संबंध ठेवलातर अशा व्यक्तीस पंचायतीचा मुखिया झाडाला टांगण्याची शिक्षा देतो. जमातीतील लोक त्याला फांदीला टांगतात आणि खाली जमीनीवर टोकदार काटे अंथरुन ठेवतात. अशी व्यवस्था केलेली असते''. (७) यासारख्या शारीरिक, मानसिक, आर्थिक स्वरुपाच्या शिक्षा दिल्या जातात. या शिक्षा अत्यंत कठोर व वेदनादायी अशा स्वरुपाच्या आहेत. माणसाचे संपूर्ण आयुष्य उध्दवस्त करणा-या आहेत. जातपंचायतीचे स्वरुप पाहिल्यानंतर रुढी, परंपरा, चालीरीती यांच्या प्रभावातून जातपंचायतीचे स्वरुप उग्र रुप धारण करीत आहे.

इतर भटक्या जातीजमातींच्या जातपंचायतीचे शिक्षेचे स्वरुप जे आहे तेच मुस्लिम धर्मीय मदारी, दरवेशी, छप्परबंद, काकर या समाजाचे आहे. 'छप्परबंद' समाजात पंचायतीचे कामकाज पाहणा-या, त्यांना न्यायनिवाडात मदत करणा-यास 'खोगीर' असे म्हणतात. पूर्वी या समाजात गुन्हेगार व्यक्तीचे मुंडन करुन काढवावरुन धिंड काढण्याची प्रथा होती. तसेच गुन्हेगारास एक किंवा दोन पैशाचा नामुश्कीचा दंड करुन जाती बहिष्कृत करण्याची पध्दत आहे. 'काकर' या समाजात तेलाचा दंड म्हणजे भयंकर शिक्षा समजली जाते. 'तेलाचा दंड' म्हणजे पर्यायाने समाजातून बहिष्कृत करणे असे समजले जाते. समाजांतर्गत भांडणतंटे, लग्न कार्य, सामाजिक अडीअडचणीच्या वेळी 'शिकलगार' समाज जातपंचायतीला महत्त्वाचे स्थान देतो. समाजात पंचायतीचा निर्णय समाजावर बंधनकारक असतो. ''अशावेळी जी व्यक्ती पंचाच्या दृष्टीने दोषी ठरते त्या व्यक्तीला ३, ७, १४, आणि ३८ रुपयांच्या प्रमाणात दंड केला जातो. साडेतीन रुपये दंड घेणे हे या समाजात अत्यंत नामुश्कीचे समजले जाते''. (८) जातीजमातीमध्ये दिली जाणारी शिक्षा ही कठोर अशा स्वरुपाची आहे. ब-याच वेळा व्यक्ती गुन्हेगार नसेलतरी पंचायतीचा प्रमुख शिक्षा देत असतो. तेंव्हा संबंधीत व्यक्तीचे संपूर्ण आयुष्य हे बहिष्कृत असेच उपभोगावे लागते. तेंव्हा त्या जातपंचायतीमध्ये काळानुसार बदल घडवून आणला पाहिजे या संदर्भात जी जी मुसळे गुरुजी मत व्यक्त करतात, ''जात पंचायतीने नेहमीच जातीतील लोकांना काळाबरोबर पुढे नेणारा निवाडा दिला पाहिजे. समाजाचा विकास अडवणारा निवाडा न्याय ठरत नाही''. (९) त्याच्या म्हणण्यामध्ये सत्यता आहे. गुन्हेगार नसतानाही त्यास शिक्षा देणे हे व्यक्तीचे आयुष्य उद्‌ध्वस्त करण्यासारखे आहे.

हिंदू, मुस्लिम, शीख प्रत्येक जमातीमध्ये जातपंचायत अस्तित्वात आहे. प्रत्येक जमातीचे कायदे, नियम, शिक्षेचे स्वरुप वेगळे व वैशिष्टयपूर्ण असे आहे. व्यक्तीविकासाला समाजाने कायदे, नियम केले पाहिजेत हे खरे असलेतरी जाती जमातींच्या पंचायतीच्या शिक्षेचे स्वरुप आहे ते संबंधीतांना अधोगतीच्या, विनाशाच्या दिशेने घेऊन जात आहे. भटक्या जातीजमातीच्या स्थितीचा व गतीचा विचार करता असे स्पष्ट होते कीं त्यांना अंधश्रध्दा, अज्ञान आणि परंपरा यातून मुक्त करणे आवश्यक आहे. देशाला आज स्वातंत्र्य मिळून ६४ वर्षे पूर्ण

झाली. या स्वातंत्र्यामध्ये व्यक्ती स्वतंत्र झाला असे आपण समजतो. परंतू जातपंचायतीच्या बंधनातून, जाचक निर्बधातून जाती आणि जमाती मुक्त झाल्या का ? हा प्रश्न सवर्णवाद्यांसमोर उभा राहतो. स्वातंत्र्याने त्यांच्या वाटयाला नेमके काय दिले ? अंधश्रध्देचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सरकारी यंत्रणा सफल झाली का ? शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले ते जातीजमातीपर्यत ख-याअर्थाने पोहचले का ? विज्ञान, तंत्रज्ञान, आधुनिकता याने माणसांच्या मानसिकतेत बदल झाला का ? असे अनेक प्रश्न भटक्या जातीजमातीच्या जातपंचायतीने उभे राहतात. या सर्व प्रश्नांची उत्तरे समाजवाद्यांना देणे शक्य नाही. त्यांच्या असणा-या समस्या संवेदनशील मनाला विचार करायला लावणा-या आहेत. या संदर्भात माजी मुख्यमंत्री (महाराष्ट्र) शरदराव पवार म्हणतात. ''प्रशासन यंत्रणेला या वर्गाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही असे सांगून पवार म्हणाले, अनेक भ्रामक कल्पना आणि अंधश्रध्दा या जमातींचे विशेषत: स्त्रियांचे जीवन उध्दवत करतात. दलितांपेक्षा भटक्या जमातींचे स्वरुप भयानक असून पूर्वापार इतिहासामुळे त्यांच्याकडे गुन्हेगार म्हणूनच पाहिले जाते. या समाजाकडे गुन्हेगार म्हणून पाहण्याची दृष्टी बदलली पाहिजे''. (१०) त्यांचे म्हणणे बरोबर आहे. भटक्या जातीजमातींच्या इतिहासाने व्यक्तींना गुन्हेगार, अपराधी ठरवलं आहे. त्यांच्याकडे प्रस्थापितांचा पाहण्याचा दृष्टीकोन अद्यापही बदलला नाही. तो बदणे गरजेचे आहे. त्यांना समाजाच्या मूळ प्रवाहामध्ये सामील करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेने महत्त्वाची भूमिका पार पाडली पाहिजे असा आशावाद जातपंचायतीच्या निमित्ताने व्यक्त केला जातो.

**संदर्भ सूची :-**

**अ.क्र** **प्रकाशन वर्ष व आवृत्ती** **पृष्ठ क्र.**

**१)** रामनाथ चव्हाण:- 'जाती आणि जमाती' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथम आवृत्ती-१९८९ पृठ क्र.३९

**२)** उ.नि. 'जाती आणि जमाती' मेहता पब्लिरिंग हाऊस पुणे प्रथम आवृत्ती-१९८९ पृठ क्र.१२८

**३)** जाती आणि जमाती मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथम आवृत्ती-१९८९ पृठ क्र. १३४

**४)** रामनाथ चव्हाण :- 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग'- सुजाता प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती १९८९ पृ.३४

**५)** उ.नि. 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग'- सुगावा प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती १९८९ पृ.५०

**६)** प्रा.मोरे रामकृष्ण:- 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत' म्हणजे सामाजिक दस्तऐवज. दै.लोकरंग दै.लोकरंग १७ जुलै २००५

**७)** चव्हाण रामनाथ :- 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग' सुगावा प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती १९८९ पृ १४९

**८)** चव्हाण रामनाथ - 'जाती आणि जमाती' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे प्रथम आवृत्ती १९८९ पृ.१०३

**९)** मुसळे जी.जी. समाजाचा विकास आडवणारा निवाडा न्याय ठरत नाही. दै. सकाळ, सोमवार १ डिसेंबर १९९८

**१०)** मा.पवार शरदराव:- भटक्या विमुक्तांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. दै.तरुण भारत ९ एप्रिल गुरुवार १९८९